# आयटकच्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा खा. चंद्रकांत खैरे यांच्या घरावर जोरदार मोर्चा

मासिक
# श्रमिक विश्व

Regd. No. MAHMAR/2004/15163



पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर नसून ती श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे.
-लोकशाहीर कॉ. अण्णाभाऊ साठे

* वर्ष १४ वे * संयुक्त अंक २-३ * फेब्रुवारी- मार्च २०१७ * किंमत -५ * वार्षिक वर्गणी :- ५०/- * पाने १६

## अर्थसंकल्पीय अधिवेशनात मानधनवाढीसाठी भरीव तरतुद करा
## पार्लमेंटमे चूप क्युं जवाब दो,खासदार खैरे होशमे आओ च्या घोषणांनी परिसर दुमदुमला

(सविस्तर वृत्त पान ११ वर)











## आंतरराष्ट्रीय महिला दिन चिरायु होवो...

# ग्रंथयात्रेस औरंगाबादेत प्रतिसाद

## आनंदराज आंबेडकर, कुलगुरु प्रोफेसर बी. ए. चोपडे आदींनी भेटी दिल्या




१४ जानेवारी : लोकवाङ्मय गृहाची ग्रंथयात्रा नागसेनवन परिसरात आली असता रिपब्लिकन सेनेचे नेते आनंदराज आंबेडकर, प्रा. के.व्ही. मोरे, माजी उपमहापौर बंडु प्रधान आदींनी भेट दिली.




१७ जानेवारी : ग्रंथयात्रेचे औपचारीक उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात कुलगुरु प्रोफेसर बी.ए. चोपडे यांनी फित कापून केले.




फित कापून उद्घाटन केल्यानंतर मनोगत व्यक्त करताना कुलगुरु प्रोफेसर बी. ए. चोपडे. यावेळी उपस्थित प्रा. धनंजय कांबळे, कॉ.प्रा. राम बाहेती, डॉ. क्षमा खोब्रागडे, राजानंद सुरडकर, डॉ. भालचंद्र कानगो, कॉ. मनोहर टाकसाळ, डॉ. निलीमा पांडे आदी.

नागसेनवन व विद्यापीठ परिसरात ग्रंथयात्रेस चांगला प्रतिसाद मिळाला.





# कॉ. पानसरेंना ठिकठिकाणी श्रद्धांजली

**औरंगाबाद**




औरंगाबादेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ते भडकल गेट येथील डॉ. आंबेडकर पुतळ्यापर्यंत मॉर्निंग वॉक काढण्यात आला. प्रा.डॉ. सुरेश तांबे यांनी मनोगत व्यक्त केले.

**बार्शी**




बार्शि येथे मोर्चा काढून निषेध करण्यात आला. काॅं. तानाजी ठोंबरे, कॉ. प्रविण मस्तुद, कॉ. शौकत पठाण आदींची यावेळी भाषणे झाली.







पुरस्कार वापस करणारे साहित्यिक गणेश देवी, पत्रकार निखिल वागळे, विनीत तिवारी, डॉ. हमीद दाभोळकर, आदींची शाहु स्मारक सभागृहात व्याख्याने झाली. मॉर्निंग वॉकही काढण्यात आला. डॉ. मेघा पानसरे, कॉ. नामदेव गावडे, कॉ. दिलीप पवार, कॉ. रघुनाथ कांबळे आदींची यावेळी उपस्थिती होती.




वर्धा येथे कॉ. पानसरे यांना श्रद्धांजली अर्पण करताना कॉ. दिलीप उटाणे व अंनिसचे कार्यकर्ते.

अखिल भारतीय आंदोलनाचा भाग म्हणून अमरावती जिल्ह्यातील वरुड येथे खा. तडस व आ. बोंडे यांच्या घरावर आयटक प्रणित अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी कॉ. बी. के. जाधव यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढला.



**कॉ. गोविंद पानसरे अमर रहे... कॉ. पानसरे लाल सलाम**


## देशाच्या स्वातंत्र्यासाठी २३ मार्च १९३१ रोजी शहीद भगतसिंग, सुखदेव, राजगुरु यांना फासावर लटकावण्यात आले. क्रांतीकारी शहीदांना क्रांतीकारी अभिवादन



पाकिस्तानच्या सिमेवर असलेल्या फिरोजपुर जिल्ह्यातील हुसैनीवाला बाग येथील क्रांतीकारकांचे स्मारक.




नोटा बंदीच्या विरोधात जिल्ह्याजिल्ह्या आंदोलन करून भारतीय कम्युनिस्ट पक्षाने १२ जानेवारी रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नागपुर व मुंबई कार्यालयावर एकाच दिवशी विराट मोर्चे काढले. मुंबईच्या मोर्चाचे नेतृत्व भाकप राज्यसचिव डॉ. भालचंद्र कानगो यांनी तर नागपुरच्या मोर्चाचे नेतृत्व सहसचिव कॉ. तुकाराम भस्मे यांनी केले.




Posting under the Registration No.
L/RNP/AGD.-74/2014-16

बुक-पोस्ट


प्रति, ________________________

________________________

संपादकीय....

# Be Bold for change... परिवर्तनासाठी निर्भय बना

दरवर्षी प्रमाणे यावर्षीही ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून जगभरात व भारतातही उत्साहात साजरा होईल. गारमेंट कारखान्यातील लढाऊ महिला कामगारांच्या कर्तबगारीमुळे क्लारा झेटकीन सारख्या विदुषी मुळे हा दिन जगभर साजरा केला जाऊ लागला. महिला लढ्याच्या गाथेचे स्मरण करुन देणारा हा दिन आहे.

Be Bold for change... परिवर्तनासाठी निर्भय बना हा यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाचा नारा आहे. निर्भयपणे कथा, कविता, नाटके, वृत्तांत लेखन करणाऱ्या, अभिनय करणाऱ्या कम्युनिस्ट पक्षाचे काम करणाऱ्या, रुढीवादाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या थोर विद्रोही विदुषी कॉ. डॉ. रशीद जहां यांच्या जीवन व कार्यावरील शकील सिद्दीकी लिखित व प्रा. रेखा मेश्राम अनुवादीत एक लेख याच अंकात महिला दिनानिमित्त आम्ही प्रकाशित करीत आहोत. या पार्श्वभूमीवर रशीद जहांप्रमाणेच निर्भीड राहणाऱ्या, धैर्य दाखवणाऱ्या महिलांना फॅसिस्ट शक्तीकडून कशाप्रकारे आज धमक्या येताहेत हेही समजून घ्यावे लागेल. या केवळ मारुन टाकण्याच्या धमक्या नाहीत तर पुरुषी वर्चस्वातून आलेल्या, लिंगभेदातून आलेल्या बलात्काराच्याही धमक्या आहेत. निर्भिडपणे पत्रकारिता करणाऱ्या, संस्कृतीच्या ठेकेदारांचे 'नकाब' फाडणाऱ्या अभिव्यक्त होणाऱ्या, असहमती दर्शविणाऱ्या महिलांना, तरुणींना, विद्यार्थिनींना अशा प्रकारच्या धमक्या देण्याचे प्रमाण गेल्या दोन वर्षात वाढले आहेत. नेहा दिक्षित, स्वाती चतुर्वेदी, गुरुमेहर कौर ही काही प्रातिनिधीक उदाहरणे आहेत.

आसाम, प. बंगाल, मणिपूर आदी राज्यातील आदिवासी मुलींना फुस लाऊन त्यांच्या दारिद्र्याचा फायदा घेऊन कशा प्रकारे गुजरात, पंजाब आदी राज्यामध्ये घेऊन जाण्यात येते, त्यांची व आई-वडिलांची परत भेटही होऊ दिली जात नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेतून, शिबिरातून हिंदुत्वाचा प्रचार करण्यासाठी या अपहरण झालेल्या आदिवासी मुलींना कसे वापरले जाते आदींचा प्रचंड परिश्रमाने नेहा दिक्षितांनी शोध घेतला. या शोधपत्रिकारितेमुळे अनेक गंभीर व थक्क करणाऱ्या बाबी त्यांना गवसल्या. या सर्वांचा इत्यंभुत रिपोर्ट 'आऊटलुक' या पाक्षिकात ८ महिन्यांपूर्वी प्रसिद्ध झाला व नेहा दिक्षितांना 'संस्कृती' नावाच्या इमारतीच्या 'वॉचमनकडून' धमक्या येण्यास प्रारंभ झाला. नेहा दिक्षितांचा लेख छापल्यामुळे आऊटलुकच्या संपादकासही पायउतार व्हावे लागले होते. **(नेहा दिक्षितांचा हा लेख एप्रिल २०१७ च्या श्रमिक विश्वमध्ये प्रकाशित करण्यात येईल)**. लहान मुलांचा होणारा व्यापार, शोषण इत्यादींचा शोध घेऊन ते उजेडात आणण्याचे काम यापूर्वीही नेहा दिक्षित यांनी केलेले होते. मात्र संघप्रणित मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर त्यांना धमक्या आल्या. गुप्तांगाचा उल्लेख करून त्यांना बलात्काराच्या धमक्या देण्यात आल्या. निर्भयपणे लिहिणाऱ्या स्वाती चतुर्वेदी नावाच्या लेखिकेलाही धमकावण्यात आले.

जी गत नेहा दिक्षित व स्वाती चतुर्वेदीची तीच गत २० वर्षीय गुरुमहेर कौर या दिल्लीच्या विद्यार्थिनीची! संघ परिवारातील अभाविपशी गुरुमहेरने 'पंगा' घेतल्यावर तिलाही बलात्काराच्या धमक्या या संस्कृतीच्या 'वॉचडॉग' (की नुसतेच डॉग?) नी दिल्या. महाराष्ट्रातील संघप्रणित सरकारमधील परिचारक नावाच्या आमदाराने असेच रंग उधळले. देशाच्या सीमाचे निर्भयपणे रक्षण करणाऱ्या शूर जवानांच्या पत्नी देखील त्याच निर्भयतेने आपापल्या गावी राहतात, आपल्या पतींचा शुरपणा डळमळीत होऊ देत नाहीत. मात्र अशा या शुर भगिनींबद्दल 'सैनिक सीमेवर तर मुले कशी होतात?' असे निर्बुद्धपणे बोलून परिचारकानी मुक्ताफळे उधळली. त्यांना तातडीने विधानसभेतून व पक्षातूनही निलंबीत करण्याचे मोठ्या आवेशाने फुत्कार सोडणाऱ्या देवेंद्र फडणवीसांना वाटले नाही. विधानसभेतून निलंबित करण्यासाठी विरोधकांनी आवाज उठविल्यावर, ठिकठिकाणी मोर्चे काढल्यावर परिचारकांना केवळ दीड वर्षासाठी विधानसभेतून निलंबीत करण्यात आले आहे!

नेहा दिक्षित, स्वाती चतुर्वेदी, गुरुमहेर कौर, सैनिकांच्या पत्नी आदी प्रातिनिधीक घटना आहेत. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर अशा कित्येक घटनांच्या श्रृंखलांकडे लक्ष दिल्यास महिलांवर- दोन वर्षाच्या बालिकेपासून ते वयोवृद्ध महिलांवरील अत्याचारांच्या घटना जगभर वाढताना दिसताहेत. 'Be Bold for change' परिवर्तनासाठी निर्भय बना असा जरी यावर्षीचा आंतरराष्ट्रीय महिला दिनाचा संदेश असला तरी निर्भयपणे वावरणाऱ्या, अभिव्यक्त होणाऱ्या, आवाज उठवणाऱ्या, लिहिणाऱ्या, कला सादर करून ठेकेदारांचा भांडाफोड करणाऱ्या महिलांना, लेखिकांना 'लक्ष्य' केले जात आहे. महिलांना दीन बनवण्याचे प्रयत्न होताहेत! पण तरीही रशीद जहांप्रमाणे निर्भयपणे वावरणाऱ्या, निर्भयपणे शोधपत्रकारिता करणाऱ्या, निर्भयपणे संघ परिवाराशी पंगा घेणाऱ्या जात वर्ग, स्त्री, दास्याविरोधात संघर्षशील असणाऱ्या सर्व क्षेत्रातील महिलांसह सर्वांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहणे, त्यांना बळ देणे, हाच निर्धार 'Be Bold for change' या घोषवाक्यास सार्थक ठरवेल! आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे हे घोषवाक्य सार्थक ठरवूया.

हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रा. डॉ. राम बाहेती यांनी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी-बालवाडी कर्मचारी युनियन (संलग्न आयटक) आयटक कार्यालय, कामगार हौसिंग सोसायटी, खोकडपूरा, औरंगाबाद येथे प्रकाशित केले. फोन नं.०२४०-२३४३७२२, **मुद्रणस्थळ : अंकूर इंटरप्राईजेस,** भारत बाजार, कॉम्प्लेक्स, जि-विंग, शॉप नं.७/९, औरंगाबाद, मो.९०२१४२४२६४ / ८०८७४९२६३२ **संपादक : प्रा.कॉ. राम बाहेती –** २४८३१८९, २४८२५९२. निवास : मोबाईल – ९४२२७१२९३३, व्यवस्थापकीय सहकार्य – कॉ. प्रकाश बनसोडे- ९४२२२७३१०९, कॉ. अनिल जावळे- ९८६००५००९१

हिंदी लघुकथा

# भूत

डॉ. पूरन सिंह

बाबा बहुत मेहनत करते थे लेकिन जमींदार बेगार तो करवाता था, पैसे नहीं देता था। कभी-कभार दे दिए तो ठीक नहीं तो नहीं्। उन्हीं पैसों से किसी तरह गुजर होती थी।

एक दिन दोपहर को मैंने माँ से कहा, बहुत भूख लगी है।''

माँ कुछ नहीं बोली उसने मिट्टी के बरतन उलटकर दिखा दिए थे।

मेरी भूख और तेज हो गई थी। भूख के तेज होते ही मस्तिष्क भी तेज हो गया था।पास ही श्मशान घाट था जहाँ बड़े-बड़े लोग अपने बच्चों को भूत-प्रेत से बचाने के लिए नारियल, सूखा गोला पूरी-खीर कई बार मिष्ठान भी रख आते थे। यह सब काम दोपहर में होता था या फिर आधी रात को। मैं श्मशान घाट चल दिया था। संयोग से वहाँ खीर पूरी और सूखा गोला रखा था। गोले पर सिंदूर और रोली लगी थी। मैंने इधर-उधर देखा। कोई नहीं था। मैंने जल्दी-जल्दी आधी खीर पूरी खा ली थी और गोला झाड़ पोंछकर अपनी जेब में रख लिया। आधी खीर पूरी लेकर मैं घर आया था। मेरा चेहरा चमक रहा था।चमकते चेहरे को देखकर माँ ने पूछा, भूख से भी चेहरा चमकता है क्याऽ। तू इतना खुश क्यों है?

मैंने बची हुई आधी खीर-पूरी माँ के आगे कर दी थी। माँ सब कुछ समझ गई थी।

माँ की आंखें छलक गई थीं और उसने मुझे अपने आँचल में छिपा लिया था मानो भूत से बचा रही हो कि उसके होंठ फड़फड़ाने लगे थे, भूत, भूख से बड़ा थोड़े ही होता है।'

मैं कुछ नहीं समझा था। मैं माँ के आंचल में और छिपता चला गया था।

कुछ स्त्रियों में विमर्श चल रहा था ।

एक ने कहा-हम युगों-युगों से दबाई जाती रही हैं, पर अब नहीं दबेंगी।''

दूसरी ने कहा-हमें घर की चारदीवारी में कैद रखा गया।''

तीसरी ने कहा-तुम घर की जीनत हो' जैसे लुभावने शब्दों के जाल में हमारी

संवेदनाओं का शोषण किया जाता रहा।''

चौथी ने कहा-यही नहींसाहित्य में भी नारी तुम केवल श्रद्धा हो' जैसी

मकड़जाली, मनभावन व्याख्या के पीछे भी कहीं न कहीं हमारा शोषण निहित था।''

पाँचवीं ने कहा-हाँ, हमें तो यहाँ तक कहा गया कि अबला जीवन हाय तुम्हारी

यही कहानी, आँचल में है दूध और आँखों में पानी'-बताइए, क्या हम केवल बेचारी'

और बच्चा' खिलाने वाली ही बनी रहेंगी?''

इस पर पहली ने कहा-वह तो छोड़िएअब पुरुषों ने यह जान लिया कि काम ऐसे नहीं चलेगा, तो उन्होंने नारी-मुक्ति' का नारा लगाना शुरू कर दिया । और फिर पूरे तंत्र' में हमारी स्वाधीनता को अपने ढंग से कैश' कराने लगे ।'' उसने सामने के पोस्टर की ओर इशारा करते हुए कहा ।

पहली की तर्क-बुद्धि से पाँचवीं अभिभूत हो उठी। उसने पोस्टर को देखते हुए ,कहा-आप सच कह रही हैं दीदी, शोषण का तंत्र तो यहाँ तक हावी है कि आज जबकि ,स्त्रियाँ अपने अधिकार एवं अस्मिता के प्रति सचेत हो चुकी हैं, तब भी पुरुष उन्हें खुलेआम बेच रहा है। अब आप ही बताइए, शेविंग-ब्लेड का ऐड होता है और फोटो हमारीपरफ्यूम पुरुषों का और आकर्षक देह हमारीआखिर क्यों ?'' उसने कई उदाहरण दे डाले।

डॉ प्रकाश, जो पाँचवीं स्त्री के पति थे, उनकी बहस को सुन अचानक बोल उठे-माफ कीजिएगा, मैं एक क्षण के लिए आप लोगों की बातें काट रहा हूँ। आप लोगों की बातें सुनकर यह निष्कर्ष निकल रहा है कि आज नारी के बिना पुरुष का किसी भी स्तर पर सरवाइव' कर पाना संभव ही नहीं है। हर स्तर पर पुरुष को उसका सहारा लेना पड़ रहा है। विज्ञापनों आदि में उसकी धमक यह सिद्ध करती है कि स्त्री डॉमिनेट' कर रही है्।'' उन्होंने सहजता से समझाने के लहजे में कहा-भई, आप गलत सोचती हैंआज के समय में तो आप सभी लीड' कर रही हैं!''

फिर डॉ प्रकाश ने उबासी लेते हुए कहा-अरे रेखा, जरा चाय तो पिला दो यारतुम्हारी चाय का तो जवाब ही नहीं।'' रेखा खुशी-खुशी पति के लिए चाय बनाने चली गई । विमर्श अब शांत था। स्त्रियाँ अपने आप को गौरवान्वित महसूस कर रही थीं्।

**अवश्य वाचा**

**या अंकात...**

प्रा. रेखा मेश्राम यांनी अनुवादीत केलेला शकील सिद्दीकी यांचा विद्रोही लेखिका डॉ. रशीद जहां यांच्या जीवन व कार्यावरील लेख आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त या अंकात प्रसिद्ध केला आहे. – संपादक

**पुढील अंकात...**

प्रेमदास गवळी यांनी अनुवादीत केलेला नेहा दिक्षित यांचा आरएसएसच्या छुप्या कारवायांचा बुरखा फाडणारा लेख डॉ. आंबेडकर जयंती निमित्त पुढील अंकात प्रकाशित करण्यात येईल. – संपादक



आंतरराष्ट्रीय महिला दिन चिरायु होवो...



# डॉ. रशीद जहां: विद्रोह आणि इंकलाबच्या इतिहासातील जादुई नायिका

लेखक : शकील सिद्दीकी
मराठी अनुवाद : प्रा. रेखा मेश्राम, औरंगाबाद

**२० व्या शतकातील तिसऱ्या चौथ्या दशकात एका वादळाप्रमाणे पुढे आलेली अतिशय चर्चिली गेलेली रंगकर्मी, कथाकार, सामाजिक आणि राजकीय कार्यकर्ता डॉ. रशीद जहा यांचा जन्म २५ ऑगस्ट १९०५ रोजी दिल्ली येथे झाला. अलीगढ येथील शेख अब्दुल्ला व दिल्ली येथील वहीदजहा बेगम यांची रशीद ही कन्या. त्या व्यावसायाने चिकित्सक होत्या.**

रशीद जहा यांच्या व्यक्तीमत्वाचे अनेक पैलू होते. कम्युनिस्ट आंदोलनात सक्रीय सहभागी असताना शोषित समाज विशेषतः स्त्रियांच्या अन्यायकारक परिस्थितीला बदलण्यासाठी त्यांच्या अतिशय सक्रिय व परिणामकारक योगदानाला विसरणे अशक्य आहे. राष्ट्रीय आंदोलनातील त्यांचे विशेषत्व म्हणजे रुढीवाद विरुद्ध ऐतिहासिक अभियान राबवून त्याला त्यांनी एक नवीन आयाम दिला. मानवी संवेदनेच्या संदर्भात एका दक्ष चिकित्सकाच्या भूमिकेतून त्यांनी त्यांच्या व्यवसायाला सामाजिक अधिष्ठाण देत एक अविस्मरणीय अतिउच्च स्थान प्राप्त करून दिले. रस्त्यावर पोलिसांच्या काठ्या खात, शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर चिकित्सा करणारी त्यांच्यासारखी झुंझार महिलाच न्याय देऊ शकते. सांस्कृतिक इतिहासातील चर्चिले गेलेले प्रगतीशील लेखन व जननाट्य आंदोलन इप्टा याची स्थापना व विस्ताराच्या महत्त्वपूर्ण भूमिकेला प्रयत्न करूनही कुणी विसरू शकत नाही. या चळवळीतील त्या स्वतः अत्यंत मुल्यवान आणि निराळ्या व्यक्तिमत्व होत्या. त्यांनीच प्रेमचंद यांना प्रगतीशील लेखक संघाच्या पहिल्या संमेलनाच्या अध्यक्षपदी येण्यास तयार केले. तिसऱ्या दशकाच्या सुरुवातीच्या दिवसात रशीद जहा यांचा उदय एक प्रकारे रुढीग्रस्त, धार्मिक अंधविश्वासाने ग्रासलेल्या भारतीय समाजाच्या ऐतिहासिक गरजेप्रमाणे झाला. जसाकी शताब्दीच्या सुरुवातीला प्रेमचंद यांचा उदयही नवीन प्रेरणांचा प्रारंभ म्हणून झाला होता. असहकार चळवळीच्या अचानक वापसीनंतर नैराश्याचे दिवस होते.

रशीद जहा अनेक बंधनांना तोडून अलीगढहून लखनऊला विज्ञान शाखेत ज्ञान प्राप्त करण्यासाठी आल्या. स्त्रीमुक्तीच्या विचाराने प्रभावित होऊन त्यांनी आपली पहिली कथा 'सलमा' इथेच लिहिली. त्यावेळी आपल्या आधुनिकतेसाठी चर्चित असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थीनी होत्या. ती कथा त्यांच्या याच महाविद्यालयातील वार्षिक अंकात छापून आली होती. आईटी महाविद्यालयातील प्रवेश घेण्यासंदर्भात रशीदजहा यांनी मुस्लीम मुलींसाठी आधुनिक शिक्षणाचे मार्ग खुले केले. त्या कठिण दिवसात इस्मत चुगताई, कुर्तल ऐन हैदर, बादशाह खान इ. मुलीना या महाविद्यालयात शिक्षण घेण्याची संधी मिळाली. यामागे रशीदजहा यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

जेव्हा सर सय्यद अहमद खाँ पण पण शिक्षण क्षेत्रात स्त्री शिक्षणाची सुरुवात करू शकत नव्हते. तेव्हा रशीदजहा यांच्या वडिलांनी अलीगढमध्येच उत्तर भारतात मुलींसाठी पहिली शाळा (१९०६) स्थापन केली. जी आज एक मोठे महाविद्यालय असून विद्यापीठाचाही एक भाग आहे. एवढेच नाही तर महिलांसाठी पहिली कला प्रदर्शन, लेडीज कॉन्फ्रेस, तसेच पहिल्या गर्ल्स हॉस्टेलची स्थापना करण्याचे श्रेयही त्यांनाच जाते. स्त्री शिक्षणाच्या प्रचाराच्या हेतुने त्यांनी जुलै १९०४ मध्ये अलीगढ येथून खातून नावाचे नियतकालीक सुरु केले. हे उर्दू भाषेतील महिलांसाठीचे

पहिले नियतकालिक होते. तर दुसरीकडे त्यांची आई वहीजहा बेगम यांनी पडदा पद्धतीसारख्या रुढीविरुद्ध विद्रोह करत लॉर्ड कर्जन यांच्या पत्नीतर्फे दिल्ली मध्ये बोलावण्यात आलेल्या एका सभेमध्ये सहभाग घेतला होता. शेख अब्दुल्लाह उर्फ ठाकूरदास यांच्याशी त्यांचा विवाह झाल्यानंतर त्यांनी आपले संपूर्ण जीवन स्त्री शिक्षणासाठी समर्पित केले. एका प्रकारे रशीदजहा यांचा संघर्ष त्यांच्या आई-वडिलांच्या पवित्र मिशनचा पुढचा टप्पा होता.

१९२४ मध्ये आईटी महाविद्यालय लखनऊ येथून इंटर पास केल्यानंतर रशीदजहा वैद्यकीय शाखेचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी दिल्ली येथील लेडी हार्डिंग कॉलेजमध्ये प्रवेशित झाल्या. कथा लेखनाविषयी स्वतःची आवड कायम ठेवत रंगमंचाशी त्या जोडल्या गेल्या. इंग्रजी नाटकाचे अनुवाद, कथेचे नाट्यरुपांतर, नाट्यप्रयोग, लेखन अभिनय तसेच दिग्दर्शन इत्यादीशी त्या एकरुप झाल्या. त्यांनी एकूण नऊ एकांकिका लिहिल्या. 'कफन'चे पहिले नाट्यरुपांतरही केले. सोबतच १९४६ ला लखनऊमध्ये गंगाप्रसाद हॉल येथे सादर करण्यात आलेल्या दृश्य नाटकात त्यांनी विजयालक्ष्मी पंडीत यांची भूमिका साकारली. कथेप्रमाणेच त्यांच्या नाटकामध्येही शोषण, असमानता, घुसमट आणि धर्म तसेच सामाजिक परंपरेच्या नावावर स्त्रीयांची करण्यात आलेली कुचंबना याविरुद्ध अतिशय राग दिसून येतो. त्यांचे लेखन वाचत असताना आपण परिवर्तनाच्या प्रेरणेने संपन्न असणाऱ्या एका जागरुक स्त्रीच्या प्रखर प्रक्रियेतून जात असतो. स्वातंत्र्य जिच्यासाठी एक राजनैतिक म्हण नव्हती तर सामाजिक मुक्तीचे ते एक साधन होते. आधुनिकता ही केवळ फॅशन नाही तर ती जगण्याची एक पद्धत होती.

लेडी हार्डिंग कॉलेजमध्ये वैद्यकीय ज्ञान प्राप्त करताना त्या विभिन्न राजकीय वातावरण आणि विचार धारतेतील चाललेला संघर्ष तसेच गांधीजींच्या नेतृत्वत्वातील स्वातंत्र्य संग्रमातील समांतर अहिंसेमध्ये विश्वास न करणाऱ्या घडामोडींच्या प्रभावात आल्या. ज्या ज्या द्वंद्वातून प्रवास करत चालल्या होत्या. त्याचा पहिला प्रकट अनुभव त्यांना लखनऊ येथे प्रॅक्टिस करताना मिळाला. जेव्हा त्यांनी गांधीजींनी केलेल्या आवाहनानुसार खादी घालणे सुरु केले. परंतु लवकरच त्या काही क्रांतीकारकांच्या संपर्कात येऊन स्वातंत्र्यासाठी सशस्त्र संघर्ष करण्याच्या समर्थक बनल्या. स्वभावानुसार त्या आधीच रागीट होत्या. विद्रोहाचे तत्व त्यांच्यासमोर होते. म्हणून या मार्गाने जाण्यासाठी त्यांना फार विचार करावा लागला नाही. साहजिकच त्या काळात सशस्त्र क्रांतीचे स्वप्न पाहणाऱ्या त्या एकट्या महिला नव्हत्या. पण हेही सत्य आहे की अशा महिलांची संख्या अत्यल्प होती. त्याच प्रमाणे कम्युनिस्ट चळवळ आणि संघटनांत त्यांचे सामिल होणे ही असाधारण घटना नव्हती, पण अतिशय महत्त्वाची आणि हिंमतीची जरुर होती. कम्युनिस्ट पार्टीतील ते त्यांच्या जीवनातील आव्हानात्मक दिवस होते. त्या एकाच वेळी डॉक्टर, पार्टीवर्कर, लेखक, नाटककार तसेच सामाजिक कार्यकर्त्यांची भूमिका वाठवत होत्या. गरीबांकडून उपचाराचे पैसे न घेता त्यांना मोफत औषधी सोबतच जेवणाचे पैसेही देत होत्या. अन्याय पीडीत महिलांचीही मदत करत होत्या. अनावश्यक बंधनांना तोडणे आणि पडद्यात न राहणे हा सल्ला देत होत्या. या सगळ्या घडामोडीत त्यांना मध्यमवर्गीय मुसलमान कुटुंबातील स्त्रीयांची परिस्थिती जवळून बघण्याची संधी मिळाली. त्यांच्या लेखनामध्ये या अनुभवाचे संघर्ष प्रत्येक वेळी दिसून येतात. धर्माच्या नावावर स्त्रीयांचे अमानवीय शारीरिक शोषण तसेच त्यांना विकासाच्या संधीपासून वंचित ठेवण्याच्या प्रवृत्तीच्या विरुद्ध त्या आपल्या लेखनातून तसेच भाषणातून प्रखर लढा देत होत्या. त्यातून त्यांचे चिकित्सक व्यक्तिमत्व दिसून येत होते. भोपाळमध्ये संपन्न झालेल्या स्त्रीयांच्या अशा एका सभेत त्यांनी जोशपूर्ण केलेल्या भाषणामुळे त्यांना प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे लागले. याचा परिणाम असा झाला की, त्यांची संपूर्ण लेखनी स्त्री अस्मिता आणि मुक्तीने प्रेरित होऊन त्यात समर्पित झाली. ज्याचा उल्लेख त्यांनी त्यांची आत्मकथा 'काजी है पैरनहज'मध्ये केला आहे.

कम्युनिस्ट पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या रुपात तरुणांसाठी केवळ त्या प्रेरणा म्हणून राहिल्या नाही तर विवाहात ठरविली जाणारी रक्कम (मेहर) पार्टीला फंडाच्या रुपात त्यांनी दिली. त्या अशा कम्युनिष्ठांपैकी नव्हत्या ज्या ड्राईंगरुम आणि कॉफीहाऊसमध्ये बसून जग बदलण्याचे स्वप्न बघणाऱ्या होत्या. त्या तर जगाला बदलण्यात गुंतल्या होत्या. त्यांनी आपल्या निष्ठेसाठी अनेक संकटे झेलली. अनेक प्रतिकुल संघर्षातून त्यांना जावे लागले. डेहराडूनच्या दौऱ्याच्या वेळेला त्यांनी सफाई कामगार, श्रमिक, विद्यार्थी यांना संघटीत केले. तर दुसरीकडे आर्य समाज मंदिरात जाऊन उच्च जातीतील स्त्रीयांना शिक्षणासाठी प्रेरित केले. आपली विचारधारा, कार्यक्रमाचा प्रचार प्रसार तसेच जनतेशी थेट संवादाच्या उद्देशाने १९३७ मध्ये 'चिंगारी' नावाच्या राजकीय मासिकाची सुरुवात केली. त्यातील संपादक मंडळात सज्जाद जहीर आणि सोहनसिंह जोश समाविष्ट होते. दुसऱ्या महायुद्धानंतर लगेचच कम्युनिस्ट नेत्यांचा शोधून शोधून जेलमध्ये बंद करण्यात येत होते. ज्यात रशीदजहा यांचे कम्युनिस्ट पती महमुदज्जुफर यांचाही समावेश होता. तेव्हा ब्रिटीश साम्राज्याच्या दडपशाही धोरणा विरोधात व भारतीय जनतेच्या मुक्तीसाठी त्यांनी प्रचड मोर्चा काढला. त्याचा तपशील आज नावालाही शिल्लक राहिला नसला तरी त्याचा उल्लेख पुस्तकांमध्ये दिसून येतो. युद्धविरोधी अभियानासाठी मदत करण्याच्या उद्देशाने त्यांनी अनेक रेडिओ नाटके लिहिली. जी सज्जाद जहीर यांच्या संपादनातून प्रकाशित नाटक संग्रहात नवीन रुपात संकलित आहे. त्यांच्या सततच्या परिश्रमामुळे त्यांना अनेक व्याधींना सामोरे जावे लागले. परिणामस्वरुप त्यांचा जुलै १९५२

मध्ये मृत्यू झाला. ह्यातुल्लाह अंसारी म्हणाले होते की, 'ती अशी ज्योत होती जिच्याविषयी हा विचारही केला जाऊ शकत नाही की ती विझली असेल.'

आवर्जुन उल्लेख करावा लागेल की, महमुदज्जुफर यांनी अमृतसर येथील उपप्राचार्यपदाचा राजीनामा देऊन तसेच रशीदजहा यांनी प्रांतीय मेडिकल सर्व्हिसेसची नोकरी सोडून कम्युनिस्ट पार्टीचा कार्यकर्ता होण्याचे स्वीकारले. स्वातंत्र्यानंतर देशातील सरकारने कम्युनिस्ट पार्टीवर प्रतिबंध लादले तेव्हा १९४९ मध्ये रेल्वे कर्मचाऱ्यांच्या ऐतिहासिक संपामध्ये सक्रीय सहभागामुळे इतर नेत्यांसोबत हाजरा बेगम आणि रशीदजहा यांनाही अटक करण्यात आली होती. इतर पंधरा कम्युनिस्ट महिलांनी रशीदजहा यांच्या नेतृत्वात न्यायासाठी उपोषण केले. जे चौदा दिवसापर्यंत चालले. प्रकृती अस्वस्थ असतानाही उपोषणाने त्यांची प्रकृती आणखीच खालावली. परंतु त्यांनी हिंमत सोडली नाही. परंतु त्या स्वतःला कॅन्सरच्या हल्ल्यापासून वाचवू शकल्या नहीत. रफी अहमद किदवाई यांच्या प्रयत्नातून त्यांना उपचाराकरिता मास्को येथे पाठविण्यात आले. जिथून त्यांना वापस येणे शक्य झाले नाही.

प्रगतीशील लेखक संघ आणि चळवळीला त्यांचे केवळ इतकेच योगदान नव्हते की, त्यांनी लंडनमधून निघणाऱ्या घोषणा पत्रावर पहिल्या लेखिकेच्या स्वरुपात हस्ताक्षर केले तर इतर भारतीय लेखकांच्याही स्वाक्षऱ्या घेतल्या. प्रगतिशील लेखक संघाच्या पहिल्या शुभारंभासाठीचे संगठण अलाहाबादमध्ये १९३५ ला यशस्वी करुन दाखविले आणि त्यांच्या लखनऊमध्ये झालेल्या पहिल्या संमेलनासाठी (एप्रिल १९३६) कठीण परिश्रम घेतले. आर्थिक जमवाजमव केली. एवढेच नाही तर मुन्शी प्रेमचंद यांना अध्यक्षपदासाठी तयारीही केले. यावर विश्वास ठेवणे अशक्य असून शकेल पण यात तथ्य आहे की जर रशीदजहा यांचा आग्रह नसता तर प्रेमचंद यांनी प्रगतिशील जनवादी रचनादृष्टीच्या अच्चस्थानावर पुरुष असतानाही या संमेलनाचे अध्यक्षपद स्वीकारले नसते आणि रुद्रौलीचे चौधरी मोहंमद अली या संमेलनाचे स्वागत समिती अध्यक्ष बनले नसते, फैज अहमद फैज यामध्ये सामील झाले नसते.

प्रगतिशील कलादृष्टीचा प्रसार तसेच प्रगतिशील चळवळीच्या संदर्भातील घडामोडींच्या प्रचारासाठी इंग्रजी नियतकालीक न्यू इंडियन लिट्रेचर सशक्त जनवादी मंचाच्या स्वरुपात प्रकाशित झाले होते. लखनऊ येथून त्यांच्या पुनःप्रकाशनाच्या यशस्वीतेसाठी रशीदजहां तसेच त्यांचे पती यांनी पुढाकार घेतला. ज्याचे कार्यालय रशीदजहा यांच्या लखनऊ येथील कैसरबाग आवारात स्थापन करण्यात आले. या नियतकालीकाचे काही अंक ब्रिटीश शासनाने जप्त केले. नियतकालीकांवर पाळत ठेवण्यात आली. अशाच प्रकारे भारतीय जन नाट्यसंघ इप्टाची स्थापना अधिवेशन मुंबईत मे १९४३ मध्ये करण्यात आली. त्यांनी जेव्हा राजेंद्रसिंह रघुवंशी आग्रा यांच्यासोबत उत्तर प्रदेशाचे प्रतिनिधीत्व केले तसेच बंगालच्या दुष्काळग्रस्त पीडीत बंगाली यांच्या मदतीसाठी इप्टाने चालविलेल्या महासांस्कृतिक अभियानाशीही त्या जोडल्या गेल्या. इप्टाच्या पहिल्या कार्यसमितीच्या विश्वसनीय सदस्या झाल्या.

डिसेंबर १९३२ मध्ये सज्जाद जहीर यांनी संपादीत केलेल्या कथासंग्रह 'अंगारे'चे प्रकाशन तसेच त्यातील त्यांची एक एकांकिका 'पर्देके पीछे' आणि एका कथेचा समावेश ही त्यांच्या जीवनातील व भारतीय साहित्यातील महत्त्वाची घटना आहे. धार्मिक भावनांना भडकवणारे अश्लीलतेचा आरोप करून त्यांच्या लेखनाच्या विरुद्ध जबरदस्त मोहीम काढण्यात आली. अलीगढ, बिजनौर, लखनऊ तसेच कानपूरच्या काही वर्तमानपत्रांनी या मोहिमेला प्राधान्य देऊन त्याचा प्रसार केला. त्यांना नाक कापून टाकू अशी धमकी देण्यात आली. 'अंगारेवाली'च्या नावाने त्या बदनाम झाल्या. पुरुषप्रधान समाजात एक स्त्री, पुरुषांच्या वर्चस्वाला प्राधान्य देणाऱ्या प्रकृतीला कायम ठेवण्यासाठी धर्माचे सहकार्य घेण्याच्या विरुद्ध विद्रोह करत होत्या. त्या पुरुषांना विचारात होत्या की स्त्रियांना सन्मानाने जगण्याचा अधिकार का नाही हाच त्यांचा गुन्हा होता. ज्यासाठी त्यांना शिक्षा करण्यासाठी निधी जमा करण्यात आला व कथासंग्रहावर प्रतिबंध आणण्यासाठी अपील करण्यात आले. 'अंगारे' जप्त करण्यात आले पण रशीदजहा सांस्कृतिक अभियानात, राजकीय संघर्षातून सक्रिय होत्याच.

डॉ. कमर रईस यांच्या मतानुसार रशीदजहां यांचे कारनामे असे आहेत की, त्यांच्या कथामुळे त्यांच्यानंतर लिहिणाऱ्या कितीतरी महिला आणि मुलींना प्रभावित केले. इस्मत चुगताई, रजिया सज्जाद जहीर, सिद्दीक बेगम, जीलानी बानो अशा कितीतरी लेखिका होत्या. ज्यांनी रशीदजहा यांचे आयुष्य आणि रशीदजहा यांच्या जादुई व्यक्तिमत्वाला मार्गदर्शक मानून आपल्या लेखनीतून उर्दुला नवीन उच्च शिखरावर पोहचवले.

आपल्या शेवटच्या कादंबरीत 'मेरी, तेरी उसकी बात' मध्ये यशपाल म्हणतात की, 'एकटी रशीदजहा दहा कॉमरेडांच्या बरोबरीची आहे.' ही स्त्रीमुक्ती संघर्षाशी निगडीत सर्व भारतीय स्त्रीयांसाठी अभिमानाची बाब आहे की ऑक्सफोर्ड युनिर्व्हसिटी प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या भारतीय लेखिकामध्ये विशिष्ट समाविष्ट केलेल्यापैकी पहिली कथा रशीदजहा यांची आहे.

कथा, नाटक, पत्रकारिता या व्यतिरिक्त त्यांनी आपल्याशी घनिष्ट असणाऱ्या कलादृष्टीकोनाच्या व्याख्येच्या उद्दीष्टाने अतिशय महत्त्वाचे निबंध देखील लिहिले आहे. 'अदब और आवाम', 'उर्दु अदब मे इन्किलाब की जरुरु', 'औरत घर से बाहर', 'हमारी आजादी', 'प्रेमचंद और तरक्की पसन्द अदीबों की पहिला कॉन्फ्रेस', 'चद्रसिंह गढवाली' आदी शीर्षकांच्या लिखानातून रशीद जहांचे विद्रोही व्यक्तिमत्व समोर येते. (सौजन्य : मुक्तिसंघर्ष)

■■■

# कविता

## माळावर गुरं राखताना

माळावर गुरं राखताना
गाय उठाबशा करत
वेणा देत
माहितगार बाईगत झुडपाआड जाऊन बसली
बघींलं पोरासोरांनी
वासराचं खूर पाय डोकं बाहेर येताना
गायीनं मूस चटाचटा चाटून घेताना

जार पडल्यावर पुटपुटलं कुणीतरी
गायचं न् बायचं सारखंच असतं
तर पोरींकडं बघून
फिदीफिदी हसली पोरं
पोरी अंग चोरून मागं सरल्या
गायीच्या डोळ्यांत स्वतःचे डोळे ओतत राहिल्या

झावळ पडताना
पोरं वासरासंगं उड्या मारत खेळतात
पोरी फुफाट्यातल्या गायीच्या खुरांवर
तळपाय उमटवत चालतात
तरवडाच्या काटक्यांना अडकलेलं
रिबीनीचं लालभडक फूल शोधतात

**– कल्पना दुधाळ**

**(साभार : आपले वाङमय वृत्त)**

# ग्रंथयात्रेस औरंगाबादेत प्रतिसाद

## आनंदराज आंबेडकर, कुलगुरु प्रोफेसर बी. ए. चोपडे आदींनी भेटी दिल्या

औरंगाबाद – लोकवाङमगृहाच्या याच्या वतीने प्रकाशित झालेल्या पुस्तकांचे प्रदर्शन व विक्री असे स्वरुप असलेल्या ग्रंथयात्रेस याहीवर्षी औरंगाबादेत चांगला प्रतिसाद मिळाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तारदिनी म्हणजे १४ जानेवारी रोजी नागसेनवनातून या यात्रेस प्रारंभ झाला. नामविस्तारदिनी दिवसभर ही यात्रा नागसेनवन परिसरात राहिली. विद्यापीठ गेटच्या आत व बाहेर लाखोंचा जनसमुदाय नामविस्तार दिनी बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी येतो. यापैकी शेकडो स्त्री पुरुषांनी ग्रंथ यात्रेस भेट दिली. रिपब्लिकन सेनेचे नेते आनंदराज आंबेडकर यांनीही ग्रंथ यात्रेस आवर्जुन भेट दिली. दुसऱ्या दिवशी पैठणगेट, औरंगपुरा परिसरात ही यात्रा गेली. १६ जानेवारी रोजी गंगापुरातील मुक्तानंद महाविद्यालयात व न्यायालय परिसरात यात्रा पोहोचली.

**कुलगुरु, प्रोफेसर डॉ. चोपडेंनी केले उद्घाटन**

१७ जानेवारी रोजी या यात्रेचे औपचारीक उद्घाटन डॉ. आंबेडकर विद्यापीठाचे कुलगुरु प्रोफेसर डॉ. बी. ए. चोपडे यांनी फीत कापून केले. विद्यापीठ परिसरातील विश्रामगृहाजवळ मोठा मंडप लाऊन ग्रंथ ठेवण्यात आले होते. कुलगुरु डॉ. चोपडे यांनी या उपक्रमाचे स्वागत केले. फीत कापल्यावर त्यांनी या उपक्रमाबद्दल व त्याच्या आवश्यकतेबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. या छोटेखानी कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॉ. प्रा. राम बाहेती यांनी केले. लोकवाङमयाची भूमिका व यात्रेचा उद्देश कॉ. डॉ. भालचंद्र कानगो यांनी यावेळी सांगितला. सूत्रसंचालन कॉ. ॲड. अभय टाकसाळ यांनी केले. प्रा. धनंजय कांबळे, डॉ. नीलिमा पांडे, डॉ. प्रतिभा अहिरे, डॉ. क्षमा खोब्रागडे, राजानंद सुरडकर, बुद्धप्रिय कबीर, कॉ. मनोहर टाकसाळ, संदीप जमदाडे, ॲड. अय्यास शेख, देविरास राजाळे, सुनिल राठोड, ॲड. संघपाल भारसाकळे आदींची यावेळी उपस्थिती होती. ही यात्रा दोन दिवस विद्यापीठ परिसरात होती. देवगिरी महाविद्यालयातही एक दिवसही यात्रा राहिली. जयभवानीनगर भागातही या यात्रेचे के. इ. हरदास, मधुकर खिल्लारे आदींनी स्वागत केले. सुमारे ५० हजार रुपयांची ग्रंथविक्री यावर्षीच्या यात्रेतून झाली.

# संविधान बचाव दिन !

औरंगाबाद, दि.२६ – प्रजासत्ताक दिन हा संविधान व आरक्षण बचाव दिन पाळण्याचे आदेश केंद्रीय पक्षाने दिल्यानुसार भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्यावतीने २६ जानेवारी रोजी सकाळी पक्ष कार्यालयात झेंडावंदन करण्यात आले. झेंडावंदनानंतर पक्ष कार्यालयापासून पैठणगेटपर्यंत स्त्री व पुरुष कार्यकर्त्यांनी हाती फलक घेऊन व संविधान बचावाच्या घोषणा देत फेरी काढली. पैठणगेट येथे समारोप करण्यात आला. भाकप जिल्हा सचिव कॉ. प्रा. राम बाहेती, खोकडपुरा शाखा सचिव कॉ. अभय टाकसाळ, देविदास राजाळे, अंगणवाडी कार्यकर्ता विजया गठडी, कल्पना फुलवाडे, मनोज भोळे, आदींचा यात सहभाग होता. भारतीय संविधान व लोकशाहीवर होणारे हल्ले रोखण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.





# झुंजार अग्रणी
## कॉ. ॲड. सयाजीराव पाटील

सातारा जिल्ह्यातील भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते कॉ. ॲड. सयाजीराव पाटील यांचा शेतकरी, कष्टकरी, कामगार, दलित, पिडीत, शोषित, शेतमजूर व तळागाळातील जनतेच्या विविध प्रश्नांसाठी अतिशय निस्वार्थी व निरपेक्षपणे केलेल्या कार्याबद्दल आज दि.१८ मार्च २०१७ रोजी सपत्निक जीवन गौरव सत्कार समारंभ कॉ. शमीम फैजी, सेक्रेटरी भारतीय कम्युनिस्ट पक्ष, नवी दिल्ली यांच्या हस्ते व कॉ. डॉ. भालचंद्र कानगो राज्य सचिव भारतीय कम्युनिस्ट पक्ष महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होत आहे. या गौरव सोहळ्यासाठी ज्येष्ठ विचारवंत भाई प्रा. डॉ. एन. डी. पाटील व मा. गणेश ठाकूर सचिव रयत शिक्षण संस्था, सातारा हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

कॉ. ॲड. सयाजीराव बळवंतराव पाटील यांचा जन्म १३ सप्टेंबर १९३४ रोजी उंब्रज, ता. कराड, जि. सातारा या ठिकाणी शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण उंब्रज गावी झाले. गव्हर्नमेंट लॉ कॉलेज, चर्चगेट मुंबई येथे त्यांनी कायद्याचे शिक्षण पूर्ण केले. त्यांनी काही वर्षे मुंबई येथे उच्च न्यायालयात वकीली केली. शालेय विद्यार्थी चळवळीत कुमार केतकर हे त्यांचे सहकारी होते. त्यावेळी त्यांचा भारतीय कम्युनिस्ट पक्षाशी संबंध आला.

त्यांनी ज्येष्ठ नेते कॉ. एस. ए. डांगे, कॉ. एस. जी. पाटकर, कॉ. गुलाबराव गणाचार्य, कॉ. बापुराव जगताप, कॉ. कृष्णा देसाई यांच्या नेतृत्वाखाली भारतीय कम्युनिस्ट पक्षात कामगार व गिरणी कामगार चळवळीत सक्रीय सहभाग घेतला.

सन १९६७ साली कॉ. पाटील यांनी सातारा जिल्हा न्यायालयात वकिली व्यवसाय सुरु केला. रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज व धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालयात त्यांनी काही वर्षे प्राध्यापक म्हणून सेवा केली. सातारा जिल्ह्यात डावी व पुरोगामी लोकशाहीवादी आघाडी भक्कम करण्यासाठी भगिरथ प्रयत्न, ज्येष्ठ स्वा. सै. कॉ. शेख काका यांच्या नेतृत्वाखाली कॉ. सयाजीराव पाटील यांनी आपले ज्येष्ठ सहकारी कॉ. राजारामबापू पाटील, कॉ. महिताब पठाण, कॉ. काकाजी कदम, कॉ. प्रभाकर महाबळेश्वरकर, कॉ. हरिभाऊ निंबाळकर, कॉ. रजनीकांत किर्वे, ॲड. भाऊसो, देसाई यांच्या माध्यमातून काम केले. महागाई विरोधात आंदोलन, मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन, मंडल आयोगाच्या शिफारसी यासाठीचे आंदोलन, फलटण तालुक्यातील खंडकरी शेतकऱ्यांचा सत्याग्रह यामध्ये त्यांना अनेकवेळा कारावास भोगावा लागला.

शिवाजी विद्यापीठ शिक्षण संघटनेच्या स्थापनेतही त्यांनी मोलाचा वाटा उचलला आहे. सातारा जिल्हा शिवाजी विद्यापीठ संघटनेचे ते सलग दहा वर्षेअध्यक्ष होते. बर्लीन येथे झालेल्या जागतिक युवक महोत्सवात कॉ. सुधाकर रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली भारतातर्फे गेलेल्या शिष्टमंडळात कॉ. पाटील सहभागी झालेले होते. कराड बार असो.चे कॉ. पाटील अध्यक्ष होते. त्यांचे अध्यक्षपदाचे कालावधीतच कराडच्या जिल्हा न्यायालयाच्या इमारतीचे उद्घाटन झाले. कॉ. शेख काका यांच्या निधनानंतर कॉ. सयाजीराव पाटील यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या जिल्हा सचिवपदी सलग पंधरा वर्षेकाम केले. ते राज्य कौन्सिलचे काही वर्षेसदस्य होते. स्वातंत्र्यानंतर शोषणविरहीत समाज निर्मिती व समान न्याय संधी व परिपूर्ण पायाभूत नागरी सुविधा असणारा सुजलाम्, सुफलाम भारत निर्माण करण्याचे स्वप्न शहीद भगतसिंगाचे होते. २३ मार्च १९३१ रोजी शहीद भगतसिंग, सुखदेव व राजगुरु यांना ब्रिटीशांनी फासावर चढविले. शहीद भगतसिंगाचे विचार तरुणांपर्यंत पोहोचविण्याकरिता कॉ. सयाजीराव पाटील यांनी आपल्या उंब्रज गावी शहीद-ए-आझम भगतसिंग प्रतिष्ठाणची स्थापना केली.असंघटीत क्षेत्रातील शेतमजूर, मजूर, कामगार, घरेलु कामगार, सफाई कामगार यांचे सर्वांगिण उन्नतीकरिता तसेच त्यांच्या मुलांच्या शैक्षणिक सुविधांसाठी कॉ. पाटील यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या माध्यमातून आंदोलन, मोर्चा, सत्याग्रह केले. सामाजिक न्यायाचा कैवारी, मानवतेचा नंदादीप, दीन-दुबळ्यांसाठी आयुष्यभर रणसंगाम करणारा, लढ्यातील क्रांती-अवलिया म्हणून कॉ. सयाजीराव पाटील यांना संपूर्ण सातारा जिल्हा ओळखतो. सामाजिक विषमता, अन्याय, अत्याचार याचेविरुद्ध न्यायासाठी व न्यायिक समतेसाठी कॉ. सयाजीराव पाटल वकीलीच्या रणांगणावर व चळवळीच्या मैदानावर सातत्याने लढत राहिले आहेत. जीवन संघर्षाने व चळवळीने त्यांचे व्यक्तिमत्व घडत गेले. जात-धर्मामुळे होणारी आर्थिक पिळवणूक व सामाजिक ससेहोलपट थांबविण्यासाठीच आर्थिक व सामाजिक समतेचे ध्येय असलेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या चळवळीचा ते अंतरंग झाले. समाजाच्या विविध घटकातील शोषित व उपेक्षितांना तिमिरातून तेजाकडे नेण्यासाठी अविरत धडपडणारा झुंजार अग्रणी कॉ. ॲड. सयाजीराव पाटील यांनी त्यांच्या भावी यशस्वी लढ्यासाठी शतशः हार्दिक शुभेच्छा.

**– कॉ. ॲड. रणजीत भगवान भोसले**
मु. पो. किन्हई, ता. कोरेगाव, जि. सातारा

# गांधीहत्येचा दिन भाकपने धर्मनिरपेक्षता दिन म्हणून पाळला







## औरंगाबादेत निदर्शने

औरंगाबाद दिनांक ३०- महात्मा गांधी यांच्या हत्येचा दिन भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने देशभर धर्मनिरपेक्षता दिन म्हणून पाळण्याच्या निर्णयानुसार औरंगाबाद भाकपच्या वतीनेही समविचारी पक्षासह हा दिन पाळण्यात आला. भाकपचे राज्य सचिव कॉ डॉ भालचंद्र कानगो यांनी प्रथम महात्मा गांधी यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण केला. ''बापू हम शरमिंदा है, तेरे कातील जिंदा है'', ''धर्मनिरपेक्षतेवर हल्ला करणारया शक्तीपासून देशाला वाचवा '', '' धर्मनिरपेक्षतेचे संरक्षण करा '', ''लोकशाहीचे संरक्षण करा '', ''हिंदू मुस्लिम बौध्द शीख इसाई हम सब भाई भाई '', ''नथुरामी शक्ती मुर्दाबाद '', '' गांधीके हत्यारे मुर्दाबाद '' आदि घोषणा यावेळी देण्यात आल्या. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव कॉ प्रा राम बाहेती यांनी यावेळी भाकपच्या देशव्यापी अभियानाचे महत्व सांगितले. प्रजासत्ताक दिनही भाकपने देशभर संविधान बचाव दिन म्हणून पाळला तर गांधी हत्या दिन धर्मनिरपेक्षता बचाव दिन पाळत असल्याचे त्यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले. स्वराज अभियानचे नेते साथी सुभाष लोमटे यांनी देशात फसिस्ट शक्तीनी धर्मनिरपेक्षता, लोकशाही व स्वातंत्र्याची मुल्ये पायदळी तुडवली असल्याचे म्हटले. सीटूचे कॉ उध्दव भवलकर यांनी धर्मनिरपेक्ष शक्तींच्या एकजुटीची आवश्यकता प्रतिपादिली. यावेळी समारोप करताना डॉ. भालचंद्र कानगो यांनी महात्मा गांधीचे मारेकरी सत्तेत बसले असून लोकशाही मुल्यावर हल्ले होत आहेत, संविधानाची मुल्येही पायदळी तुडवली जात असल्याचे त्यांनी यावेळी सांगून गांधी हत्येची कारणे त्यांची हत्या करणाराकडून वेगवेगळी सांगितली जातात.

जनतेची दिशाभूल करण्याचे काम त्या हत्येच्या दिनापासून ते आजतागायत ही मंडळी करीत असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला. धर्मनिरपेक्षतेच्या रक्षणासाठी सर्व पुरोगामी ,धर्मनिरपेक्ष शक्तीनी एकजुटीने पुढाकार घेण्याची व हल्ले थोपवण्याची गरज कांगो यांनी यावेळी सांगितली.

तन्जीम ए इन्साफचे एस. जी. शुत्तारी, भाकपचे कॉ. ॲड अभय टाकसाळ, कॉ. प्रकाश बनसोड, कॉ पोपट गायकवाड, एआयएसएफचे जिल्हा सचिव ॲड अयास शेख, राजु हिवाळे, अनिसच्या सोनाली नागभिडे, अतुल बडवे, किसन मुळे, मानवमुक्ती मिशनचे श्री गरुड सर, आयटकप्रणित ग्रीव्हज कामगार युनियनचे पी. एम. शिंदे, कॉ बोरुले, कॉ. भोंबे, कॉ. सूर्यवंशी, आदिंसह कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते .

## गोंदियात मोर्चा

गोरेगाव (गोंदिया) – भारतीय कम्युनिस्ट पार्टी व महाराष्ट्र राज्य लाल बावटा शेतमजूर युनियन गोरेगाव तालुका कौसिल द्वारा ३० जानेवारी २०१७ ला बस स्टॅण्ड चौकात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा ६७ वा शहीद दिनानिमित्त श्रद्धांजली वाहण्यात आली. शेतमजूर व बेघर व ग्रामीण कष्टकऱ्यांच्या मागण्यासाठी मोर्चाही काढण्यात आला.

यावेळी कॉ. हौसलाल रहांगडाले, कॉ. मिलिंद गणवीर, कॉ. प्रल्हाद उके, कॉ. चरनदास भावे, कॉ. परेश दुरुगवार, कॉ. भैयालाल कटरे, कॉ. नारायण भलावी, कॉ. रायाबाई मारगाये, कॉ. लिलाबाई वाघाडे, कॉ. राधाबाई शेन्डे यांचा समावेश होता.



बापू हम शरमिंदा है... तेरे कातील जिंदा है...

# आयटकच्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा खा. चंद्रकांत खैरे यांच्या घरावर जोरदार मोर्चा

औरंगाबाद दि. २८ - अर्थसंकल्पीय अधिवेशनात लोकप्रतिनिधीनी संसदेत आवाज उठवावा या हेतुने आयटकप्रणित अंगणवाडी कर्मचारी युनियनने औरंगाबाद जिल्हा कमिटीच्या वतीने देशव्यापी आंदोलनाचा भाग म्हणून खासदार चंद्रकांत खैरे यांच्या घरावर २८ जानेवारी रोजी मोर्चा काढण्यात आला. मोर्चाच्या परवानगीसाठी दिवस दिवसभर आयटकच्या कार्यकर्त्यांना पोलिस स्टेशनमध्ये थांबावे लागले तरी परवानगी देण्यात आली नाही व मोर्चाच्या दिवशी अचानक सकाळी क्रांतीचौक पोलिसानी परवानगीसाठी ठाण्यात बोलावले या कारभाराचा निषेध करण्यात आला. तसेच परवानगीची सुलभ पध्दत नसल्यामुळे व कार्यकर्त्यांची छळवणूक होत असल्याने नाइलाजास्तव वीनापरवानगी मोर्चा काढण्यात येईल असे आयटकच्या वतीने खा. खैरे व उपस्थित पोलिस अधिकारयांसमक्षच जाहीर करण्यात आले.

आयटकच्या खोकडपूरा येथील कार्यालयापासून मोर्चास प्रारंभ झाला व खासदारांच्या घरावर मोर्चा पोहचल्यानंतर तेथेच सुमारे १ हजार अंगणावाडी महिलांनी ठाण मांडले. कांही वेळातच खा. खैरे हेही मोर्चाला सामोरे आले,त्यांना आयटकच्या वतीने २० मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

महाराष्ट्र विधानसभा व विधान परिषदेच्या आमदारांचे तसेच मंत्री व सर्व संबधीतांचे वेतन वाढवण्यापूर्वी केंद्र सरकारनेही ७ वा वेतन आयोग कर्मचारयांसाठी लागु करण्याचा निर्णय घेतला होता. संसदेतील खासदारानाही चांगले वेतन,पेन्शन व सुविधा प्राप्त होताहेत.व आणखीही दुप्पट पगार वाढ करण्याचा प्रस्ताव आहे. लोकप्रतिनिधींच्या वेतनवाढीस किंवा सरकारी कर्मचारयांना ७ वा वेतन आयोग लागु करण्यास विरोध नाही. मात्र वेतनश्रेणी मिळण्यासाठी,१ ला वेतन आयोग लागु करण्यात यावा या मागणीसाठी व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत किमान वेतन देण्यात यावे या मागणीसाठी गेल्या अनेक वर्षापासून संघर्ष करणारया देशभरातील लाखो अंगणवाडी कर्मचारयांना मात्र वारयावर सोडण्यात आले आहे असे निवेदनात नमुद करण्यात आले आहे. अंगणवाडी कर्मचारयांच्या वेतनवाढीच्या प्रश्नावर संसदेच्या सभागृहात खासदार खैरे व इतर लोकप्रतिनिधीनीही आवाज उठवावा असे आवाहनही यावेळी करण्यात आले. खा खैरे यांनी संसदेत आवाज उठवण्याचे तसेच राज्य कामगार वीमा योजनेचे लाभ अंगणवाडी कर्मचारयांनाही लागु करण्यासंदर्भात प्रयत्न करण्याचे आश्वासन यावेळी दिले.

आयटक प्रणित युनियनचे राज्य उपाध्यक्ष तथा जिल्हा अध्यक्ष कॉ. प्रा. राम बाहेती, माजी नगरसेवक कॉ. अशफाक सलामी, संघटक कॉ.अनिल जावळे, आयटकचे कायदा सल्लागार कॉ. ॲड. अभय टाकसाळ, कॉ. विलास शेंगुळे, सचिव तारा बनसोडे, कॉ.शीला साठे, कॉ.शालिनी पगारे, ॲड़ अयास शेख, कॉ.देविदास राजाळे, कॉ विजया गठडी, कॉ विजया गाढवे, कॉ मनीषा भोळे, कॉ अलका खरात, कॉ नीता किर्तीशाही, कॉ वैशाली गायकवाड, कॉ मंगल धत्तींगे, कॉ शाहीस्ता काझी, कॉ रंजना राठोड, कॉ मुरली म्हस्के, कॉ विष्णू काकडे, कॉ संग्राम कोरडे, कॉ. मीरा अडसरे, कॉ गंगा जंजाळ, कॉ सरला कदम, कॉ चंचल खंडागळे, कॉ सुनिता शेजवळ, कॉ. मुरली म्हस्के, अलका सोलट, संपदा कांबळे, ललिता दीक्षीत, कमल शिरसाट, बेबी डिडोरे, प्रयाग गवळी, प्रमिला शिंदे, छबूबाई डोंगरे, रुखमण साळवे, कॉ किसन मुळे, आलमनुर शेख, विमल वाडेकर, रत्ना भावसार, सीमा व्यवहारे, सुनिता नाडे, रत्ना भावसार, अनिता पावडे, मंगल परदेशी, साळुका बागले आदि विविध बीटच्या अघ्यक्ष सचिवानी या मोर्चाचे नेतृत्व केले.

मोर्चानंतर पुन्हा आयटक कार्यालयाच्या परिसरात मेळावा घेण्यात आला. कॉ बाहेती, कॉ अशफाक सलामी, कॉ अभय टाकसाळ, कॉ कैलाश कांबळे, कॉ अनिल जावळे, कॉ शालिनी पगारे यांची यावेळी भाषणे झाली. अल्प अवधीतही खासदाराच्या घरावरील मोर्चा यशस्वी केल्याबद्याल आयटकच्या वतीने जिल्हाभरातून आलेल्या सुमारे १ हजार कर्मचारयांचे आभार मानन्यात आले.



अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या एकजुटीचा विजय असो

**जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीमध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाने औरंगाबाद जिल्ह्यात ३ जिल्हा परिषदेच्या व ४ पंचायत समितीच्या जागांवर निवडणूक लढविली. या निवडणुकीची भाकप औरंगाबाद जिल्हा कमिटीने चांगली तयारी व नियोजन केले होते. समविचारी पक्षांची आघाडी करण्याचाही प्रयत्न केला. माकप, जनता दल (सेक्युलर) व स्वराज अभियानने निवडणूक न लढवण्याचे ठरवले. भारिपचे प्रतिनिधी १-२ बैठकांना उपस्थित होते, परंतु भारिप स्वतंत्रपणे लढला. शेकापाने शेवटपर्यंत नेमके किती उमेदवार उभे केले हेही समजू शकले नाही. भाई काकासाहेब शिंदेनी सर्व जागा लढवण्याचे अनेकदा सूतोवाच केले, परंतु ते शेवटपर्यंत शक्य झाले नाही. अशा परिस्थितीत भाकपने पूर्वीपासूनच ठरवल्यानुसार मैदानात उतरण्याचे निश्चित केले. जिल्ह्याची बैठक, तालुकावार बैठका घेऊन उमेदवार निश्चित केले.**

# भाकपने लढवल्या ७ जागा!

## पैशेवाल्यांशी जिद्दीने टक्कर देणाऱ्या उमेदवारांचे भाकपने केले अभिनंदन!

ज्या गंगापूर तालुक्यातून दोन वर्षांपूर्वी आमदारकीची निवडणूक भाकपने लढवली तेथून दोन जिल्हा परिषदा व दोन पंचायत समितीच्या जागा लढवण्यात आल्या. तर फुलंब्री तालुक्यात १ जि.प. व १ पंचायत समिती तसेच खुलताबाद तालुक्यातून एक पंचायत समिती लढवण्यात आली. सुमारे १ लाख रुपयांपेक्षा जास्त आर्थिक सहाय्य जिल्हा पक्षाने उमेदवारांना केले. त्यासाठी औद्योगिक कामार, अंगणवाडी युनियन तसेच वैयक्तिक मदतही उभी करण्यात आली होती.

फुलंब्री तालुक्यातील वावना ग्रामपंचायतीमध्ये भा.क.प.च्या सरपंच आहेत. अनेक वर्षेही ग्रामपंचायत पूर्वीही भाकपकडे होती. वावना जवळच असलेल्या बाबरा जि.प. गट व गणातून अनुक्रमे किसान सभेचे अध्यक्ष कॉ. अशोक जाधव व कॉ. विठ्ठल आव्हाढ निवडणूक लढले. कॉ. अशोक जाधव यांना ११९७ तर विठ्ठल आव्हाड यांना पावणे सहाशे मते मिळाली.

खुलताबाद तालुक्यातील राजेराय टाकळी या गणातून कॉ. कारभारी जाधव यांनी निवडणूक लढविली. त्यांची मते अद्याप समजलेली नाहीत. गंगापूर तालुक्यातील गाजगाव ग्रामपंचायतीमध्ये भाकपचे तीन सदस्य आहेत. गाजगाव हे गाव तुर्काबाद गटात येत असल्याने तुर्काबाद गट व गण दोन्हीही लढवण्यात आले. ग्रामपंचायत सदस्य व किसन सभेचे जिल्हा सचिव कॉ. कैलास कांबळे यांच्या पत्नी श्रीमती चंद्रकला कांबळे यांना या गटासाठी तर कल्पना देवबोने यांना गणासाठी उमेदवारी देण्यात आली. जि.प. गटात भाकपच्या चंद्रकला कैलाश कांबळे यांना ११९२ तर गणात कल्पना देवबोने यांना १०५४ मते मिळाली.

गंगापूर तालुक्यातच अंबेलोहळ जि.प. गटातून शेतमजूर युनियनचे राज्य कौन्सिल सदस्य कॉ. गणेश कसबे यांनी निवडणूक लढवली. तसेच याच गणातून कॉ. राजू बत्तीशे यांनी निवडणूक लढविली. अंबेलोहळ गटातून कॉ. गणेश कसबे यांना १४७७ मते मिळाली. तर गणातून कॉ. राजू बत्तीसे यांना ६३० मते मिळाली. कॉ. गणेश कसबे हे अंबेलोहळ गटातील कदीम टाकळीचे रहिवाशी आहेत. तेथील ग्रामपंचायतीमध्ये भाकपचा एकही सदस्य नाही. तरीही पंचक्रोशीतील परिचयामुळे, रोजगार हमी कामाच्या सततच्या लढ्यामुळे, कदीम टाकळी येथे सतत होत असणाऱ्या सभा व कार्यक्रमामुळे कॉ. कसबे १४७७ मतापर्यंत मजल मारु शकले. कदीम टाकळी येथे झालेल्या ६३० मतदानापैकी एकटया गणेश कसबेंना ४२५ मते मिळाली आहेत. वावना, अंबेलोहळ, व गाजगाव या तीनही गावात भाकप उमेदवारांना क्रमांक एकची मते मिळाली आहेत हे विशेष!

मतदारांना आमिषे दाखवली जाता, मते विकत घेतली जातात, पैशाच्या जोरावर निवडणुका लढवल्या जातात, अशाही परिस्थितीत भाकपला गंगापूर तालुक्यात दोन गटातील सुमारे ५० गावांत ४ हजार तर इतर २ तालुक्यात सुमारे दोन हजार मते मिळाली आहेत. पैसे न घेताही मतदान करणारे काही मतदार आहेत हे स्पष्ट आहे. अशा मतदारांचे आभार मानण्यासाठी आभाराच्या जाहीर सभा मार्चमध्ये घेण्याचा निर्णय भाकपच्या २८ फेब्रुवारी रोजी झालेल्या जिल्हा कौन्सिल बैठकीत घेण्यात आल्या आहे.

भाकपच्या सर्व ७ उमेदवारांनी जिद्दीने निवडणूक लढवली, पैशेवाल्यांशी टक्कर दिली व अत्यंत, कमी पैशांत निवडणूक लढवली. त्याबद्दल सर्व उमेदवारांचे भाकप जिल्हा कौन्सिलने अभिनंदन केले आहे.



**निवडणूक सुधारणा त्वरित करा...**

## कॉ. गोविंद पानसरे यांचे स्मरण

# विद्यापीठ ते भडकलगेटपर्यंत मॉर्निंग वॉक

औरंगाबाद - प्रसिध्द कम्युनिस्ट नेते, विचारवंत, लेखक कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या व्दितीय स्मृति दिनानिमित्त दि.२० फेब्रुवारी रोजी विद्यापीठातील गेस्टहाउस जवळच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयापासून ते भडकल गेट येथील डॉ. आंबेडकर यांच्या पुतळयापर्यंत मॉर्निंग वॉक काढण्यात आला. लोकशाहीवादी पक्ष, संघटना, नागरिक व विद्यार्थ्यांचा यामध्ये मोठा सहभाग होता. सकाळी सात वाजता विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयापासून यास प्रारंभ झाला. विद्यापीठ गेट-नागसेनवन परिसर-पानचक्की- घाटी मार्गे हा मॉर्निंग वॉक भडकल गेट येथील डॉ. आंबेडकरांच्या पुतळयापर्यंत पोहचला.

सोनाली नागभिडे, ॲड संघपाल भारसाकळे, प्रा. भारत शिरसाट, बुध्दप्रिय कबीर, अतुल बडवे, ॲड अयास शेख, ॲड़ अभय टाकसाळ, कॉ. भास्कर लहाने, कॉ. प्रकाश बनसोड, सतिश निकम, डॉ. भालचंद्र कानगो, ॲड रमेशभाई खंडागळे,विकास गायकवाड, सतिश निकम, राजू हिवराळे, संग्राम कोरडे, लोकेश कांबळे, नितीन व्हावळे, कॉ. कॉ. भीमराव बनसोड, ॲड़ जनार्दन भोवते, मेजर सुखदेव बन, प्रा. कॉ पंडित मुंडे. प्रा.कॉ. राम बाहेती, सुनिल राठोड, डॉ. उमाकांत राठोड, अतिश गवळे, मधूकर खिल्लारे, वसूधा कल्याणकर, प्रा. डॉ श्रीकांत तांबे, सुनिता लोंढे, देविदास किर्तीशाही, शेख खुर्रम, मेजर सुखदेव बन, शहाजी भोसले, अर्जुन भूमकर, संदीप पेठे, प्रा. क्षमा खोब्रागडे, डॉ. रश्मि बोरिकर, प्रा. विजय दिवाण, गौतम लांडगे, मिलींद काकडे, प्रकाश बनसोड, क्रांती भोवते, आदिंसह सुमारे २०० जणांची यावेळी उपस्थिती होती. भडकल गेट येथे पोहचल्यावर तेथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास प्रथम पुष्पहार अर्पण करण्यात आला. कॉ. गोविंद पानसरे यांच्या प्रतिमेसही सर्वानी यावेळी फुले वाहिली. डॉ. भालचंद्र कानगो,शिरीष तांबे यांचे यावेळी भाषणे झाली.

## अहमदनगर: कॉ. पानसरेंना अभिवादन

कॉ. गोविंद पानसरे यांच्या द्वितीय स्मृतीदिनानिमित्त न्या. बी. जी. कोळसे पाटील यांचे अभिव्यक्ति स्वांतत्र्या समोरील आव्हाने या विषयावर पटवर्धन स्मारक सभागृहात करण्यात आले. बहुजनांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची सतत गळचेपी होत आहे. खरे बोलणे गुन्हा ठरत आहे. अशी खंत व्यक्त केली. आ. संग्राम जगताप, कॉ. स्मिता पानसरे, कॉ. सुभाष लांडे, कॉ. बन्सी सातपुते आदींची उपस्थिती होती.

## नोटाबंदी : खोकडपुरा शाखेच्या वतीने ४ ठिकाणी कॉर्नर सभा

भाकपच्या देशव्यापी आंदोलनाचा भाग म्हणून भा.क.प. खोकडपुरा शाखेच्यावतीने बापुनगर कामगार सोसायटी, सब्जीमंडी आदी भागात ३ ते १० जानेवारीपर्यंत कॉर्नर सभा घेण्यात आल्या. शाखा सचिव कॉ. ॲड. अभय टाकसाळ, ॲड. कॉ. अयाज शेख आदींनी यासाठी पुढाकार घेतला. पैठणगेट येथेही भाकपच्या वतीने १० जानेवारी रोजी निदर्शने करण्यात आली. कॉ. अश्फाक सलामी, कॉ. भास्कर लहाने, कॉ. राम बाहेती, कॉ. अभय टाकसाळ आदींची यावेळी उपस्थिती होती.

## ला. स्टेशन येथे निदर्शने

नोटाबंदी विरोधातील आंदोलनाचा भाग म्हणून भाकपच्यावतीने लासूर स्टेशन येथे ७ जानेवारी रोजी डॉ. आंबेडकर चौकात निदर्शने करण्यात आली. भाकपचे राज्य सचिव मंडळ सदस्य कॉ. नामदेव चव्हाण, कॉ. कैलास कांबळे, कॉ. गणेश कसबे, कॉ. किशोर पवार यासह आदींची यावेळी उपस्थिती होती.

## कोल्हापुरात स्मृतीजागर

कॉ. पानसरे यांच्या स्मृतीनिमित्त स्मृती जागर सभा झाली. मध्य प्रदेशातील ११ लेखकांसह गणेश देवी आदी साहित्यिक यावेळी विशेषत्वाने आले होते. मध्य प्रदेशातील लेखकांनी १४ फेब्रुवारीपासून पुणे येथील एफ.टी.आय.आय. पासून ६ दिवसीय संवाद यात्रा काढल्या होती. सकाळी निघालेल्या मॉर्निंग वॉकमध्येही या सर्व लेखकांसह प्रा. एन.डी. पाटील, कॉ. उमा पानसरे, डॉ. मेघा पानसरे सहभागी झाले होते.



नांदेड महापालिकेसमोर मराठवाडा नगरपालिका, महानगरपालिका कामगार कर्मचारी युनियन लालबावटा यांचे वतीने कंत्राटी सफाई कामगारांचे थकीत वेतनासाठी ठिया आंदोलन करण्यात आले. यावेळी कॉ. प्रदीप नागापूरकर, कॉ. के. के. जांबकर, गणेश, देवराव नारे, श्याम सोनकांबळे, गौतम सुर्य, अख्तर पठाण, वैशाली घुगे, पौळ बाई, वंदना वाघमारे, गोपाळ कैरमकोंडा, शांताबाई आदी.

# भाकपच्या ३ ते १२ जानेवारी दरम्यान देशभर 'जवाब दो हिसाब दो' आंदोलनास उदंड प्रतिसाद

**५०० व १००० च्या सुमारे १५ लाख कोटी मुल्याच्या नोटांपैकी किती नोटा बँकांमध्ये आजपर्यंत जमा झाला आहे? सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केलेल्या ९ प्रश्नांची उत्तरे देण्यास विलंब का? आदी प्रश्न विचारण्यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्यावतीने ३ ते १२ जानेवारी दरम्यान देशभर जबाब दो हिसाब दो आंदोलन करण्यात आले.**




**वाळूज येथील जाहीर सभेत बोलताना डॉ. भालचंद्र कानगो. मंचावर कॉ. अश्फाक सलामी, कॉ. मनोहर टाकसाळ, कॉ. राम बाहेती, कॉ. महेबुब कुरेशी**

औरंगाबाद - पंतप्रधान नरेंद्र मोदींनी चलनातून ५०० व १००० च्या नोटा बाद केल्यानंतर ५० दिवसांत परिस्थिती सुधारेल असे आश्वासन दिले होते. तसेच मोठ्या नोटा चलनातून बाद केल्यामुळे काळा पैसा बाहेर येईल, भ्रष्टाचार थांबेल असेही म्हटले होते. आता ५० दिवस झाल्यानंतर काळा पैसा बाहेर आला का? आला असेल तर किती काळा पैसा बाहेर आला? भ्रष्टाचार थांबला का?

५०० व १००० च्या सुमारे १५ लाख कोटी मुल्याच्या नोटांपैकी किती नोटा बँकांमध्ये आजपर्यंत जमा झाला आहे? सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केलेल्या ९ प्रश्नांची उत्तरे देण्यास विलंब का? आदी प्रश्न विचारण्यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्यावतीने ३ ते १२ जानेवारी दरम्यान देशभर जबाब दो हिसाब दो आंदोलन करण्यात आले.

औरंगाबाद जिल्ह्यात ३ जानेवारी रोजी वाळुज येथे जाहीर सभा घेऊन या आंदोलनाची व अभियानाची सुरुवात झाली. तर १२ जानेवारी रोजी नवीन मुंबई व नागपूर येथील रिझर्व्ह बँकेच्या कार्यालयावर मोर्चाही काढण्यात आला. वाळुज येथे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव कॉ. डॉ. भालचंद्र कानगो, कॉ. मनोहर टाकसाळ, कॉ. राम बाहेती, कॉ. आश्फाक सलामी यांची भाषणे झाली.

५०० व १००० च्या नोटामुळे काळा पैसा दडलेला आहे. या सरकारच्या म्हणण्याशी भाकप सहमत नसून काळा पैशाची इतर विविध स्त्रोते आहेत. त्यांच्यावर घाला घालण्याऐवजी मोदी सरकारने सर्वसामान्यांच्या पैशावर डल्ला मारला आहे. व त्याचे जगणे मुश्किल करून टाकले आहे. भ्रष्टाचाराचीही अनेक प्रकरणे नोटाबंदीनंतरही उघडकीस आली आहेत. सर्वोच्च न्यायालयानेही सरकारला या मनमानी कारभाराविरोधात ९ प्रश्ने विचारली आहेत. त्याचे उत्तर सरकारच्यावतीने अद्याप देण्यात आलेले नाही. या पार्श्वभूमीवर भाकपने हे जवाब दो हिसाब दो आंदोलन देशभर केले.

जनतेने दिशाभूल करुन घेऊ नये, सामान्यांचा पैसा धनाढ्यांसाठी वापरण्याचा सरकारचा डाव आहे तसेच परदेशातील काळा पैसा परत आणण्यात मोदी सरकार अपयशी ठरले असल्याने हा नवीन फंडा सरकारने काढला आहे, असे आवाहन भाकपने ठिकठिकाणी केले.